




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०३ ● अंक : ०४४ ● पुणे ● रविवार, दि. २६ ऑक्टोबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




रमेश गायकवाड यांचा वाढदिवस उत्साहात साजरा 3



"वाघोलीला डर्टी कोणी केलं?" 4

# आक्रमक जैन, मोहोळ बेचैन

## 'जैन बोर्डिंग' प्रकरणात भाजपची सारवासारव; मुरलीधर मोहोळांची मुख्यमंत्र्यांशी चर्चा, समाजाला पाठिंब्याची भूमिका

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील 'जैन बोर्डिंग प्रकरण' हे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अंगलट येण्याची शक्यता लक्षात येताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घातले. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी भेट घेऊन चर्चा केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी आदेश देताच भाजपने या प्रकरणात शनिवारी सारवासारव केली. तसेच जैन समाजाबरोबर असल्याची भूमिकाही जाहीर केली.

पुण्यातील 'जैन बोर्डिंग'च्या जागेचा वाद गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. या जागेच्या व्यवहारामध्ये मोहोळ यांचा सहभाग असल्याचा आरोप शिवसेना (शिंदे) पक्षाचे महानगरप्रमुख, माजी आमदार रवींद्र धंगेकर करत आहेत. परंतु संबंधित बांधकाम व्यावसायिक हा भागीदार नसल्याचा दावा मोहोळ यांनी केला आहे.

दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जैन समाजाचा रोष पत्करावा लागण्याची शक्यता असल्याने मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणात लक्ष घातले.

मुख्यमंत्र्यांनी आदेश देताच शनिवारी दिवसभर भाजपचे स्थानिक नेते आणि मोहोळ सक्रिय झाले. 'भाजप जैन समाजाच्या पाठीशी आहे. या प्रकरणात समाजाच्या मागण्या आणि भूमिका मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचवून त्या सोडविण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे. जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द करण्याची मागणी जैन मुनी आणि जैन समाजाकडून केली जात आहे. त्यासाठी आंदोलन करून मोर्चा काढण्याचा इशाराही जैन बांधवांनी दिला.

या मोर्चात सहभागी होण्याची भाजपची तयारी आहे,' अशी भूमिका भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी सभागृह नेते गणेश बिडकर यांनी पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट केली.



### मोहोळांचा जैन मुनींशी संवाद

**भाजपच्या पदाधिकाऱ्यांची पत्रकार परिषद सुरू असतानाच मुरलीधर मोहोळ यांनी जैन बोर्डिंग येथे जाऊन जैन मुनींशी संवाद साधला. 'भाजप सदैव जैन समाजाच्या पाठिशी असून, जैन बांधवांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न करणार आहे' असे आश्वासन मोहोळ यांनी दिले.**

### रवींद्र धंगेकरांनी काय म्हटलं?

"तमाम पुणेकरांना मी एका गोष्टीची माहिती देऊ इच्छितो, आज आपल्या सर्वांच्या वतीने मी जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द व्हावा व प्रकरणाची कठोर चौकशी व्हावी, यासाठी देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांना पत्राद्वारे विनंती करत आहे. तसेच २७ ऑक्टोबर २०२५ पासून हा व्यवहार रद्द होईपर्यंत मी तमाम पुणेकरांसह जैन बोर्डींग येथे बेमुदत धरणे आंदोलनास बसत आहे.

आजपर्यंतच्या गेल्या अठरा दिवसांच्या संपूर्ण संघर्षात माझ्यासह अनेक लोकांनी, अनेक वेळा या गोष्टीचे प्रत्यक्ष पुरावे दिले की, व्यवहारातील सर्वच व्यक्ती व संस्था या मुरलीधर मोहोळ यांच्या संबंधित आहेत. आज मी या पत्र्यामध्ये देखील आपल्या सर्वांच्या माहितीसाठी या संपूर्ण घटनेचा घटनाक्रम देत आहे", असं रवींद्र धंगेकर यांनी म्हटलं आहे.

> **या प्रकरणात माझ्यावर झालेले आरोप खोटे आहेत. जैन समाजाला न्याय मिळवून दिला जाईल. पुढील काही दिवसांत हा प्रश्न संपलेला असेल. हा विषय मिटविण्यासाठी जैन मुनींची भेट घेतली.**
> **– मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री**

> **'मुरलीधर मोहोळ महापौर असताना बिल्डरची गाडी वापरायचे' असं धंगेकरांनी म्हटलं. त्यांच्या आरोपानंतर आता मोहोळ यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. 'मी महापौर असताना अडीच वर्ष स्वतःची गाडी स्वतःच्या खर्चाने वापरली', असं मोहोळ यांनी म्हटलं आहे.**

### 'जैन बोर्डिंग' प्रकरण काय?

- पुण्यात शिवाजीनगर येथील मॉडेल कॉलनीमध्ये 'शेठ हिराचंद नेमचंद जैन दिगंबर बोर्डिंग ट्रस्ट' या धर्मादाय संस्थेची (स्थापना १९८५) 'जैन बोर्डिंग' ही वसतिगृहाची जागा आहे. ज्या विकसकाने ही जागा विकासासाठी घेतली, तो बांधकाम व्यावसायिक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा व्यावसायिक भागीदार आहे. काही विश्वस्तांनी जमीन विकताना आवश्यक परवानगी आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता व्यवहार केल्याचा आरोप आहे. या व्यवहारामुळे जैन समाजात रोष आहे. या प्रकरणात आता धर्मादाय आयुक्तांनी 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचा आदेश दिला आहे. हा व्यवहार रद्द करावा, अशी 'बोर्डिंग बचाव कृती समिती'ची मागणी आहे.
- ट्रस्टच्या जागेवर मंदिर आहे का, त्याचा तपशील काय आहे, मंदिराचे व्यवस्थापन कोण करत आहे, जागेचे क्षेत्रफळ किती आहे, या सर्व बाबींचा अहवाल मागविण्यात आला आहे. २७ ऑक्टोबरपर्यंत हा अहवाल द्यायचा आहे. हा व्यवहार रद्द करावा, अशी 'बोर्डिंग बचाव कृती समिती'ची मागणी आहे.

### 'धंगेकरांवर १० गुन्हे, पण माझ्यावर एक गुन्हा दाखवा...'

"आता त्यांचे (रवींद्र धंगेकर) दररोज अनेक विषय बाहेर येत आहेत. २०११ मध्ये त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल आहे. कोथरुडमध्ये जमीन बळकावली तर तेथेही जामीन न घेता ते पळाले होते. अशा प्रकारचे गुन्हे त्यांच्यावर (रवींद्र धंगेकर) आहेत. वक्त बोर्डाचा गुन्हा आहे, हा गुन्हा आहे असे १० गुन्हे आहेत. माझ्यावर एक गुन्हा दाखवा", असं मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे.

### 'मोहोळांनी मंत्रिपदावर राहणे योग्य नाही' : धंगेकर

"जैन बोर्डिंगचा व्यवहार रद्द होण्याबरोबरच समाजातील मंदिरे व देवस्थानच्या जागा हडप करणाऱ्या टोळीवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी या प्रकरणाची निपक्षःपाती चौकशी होणे गरजेचे आहे. ही मी निपक्षःपाती चौकशी तेव्हा शक्य आहे, जेव्हा सदर प्रकरणातील मुरलीधर मोहोळ हे आपल्या पदाचा राजीनामा देतील. कारण त्यांच्या केंद्रीय मंत्रिपदाच्या प्रभावाखालीच हा इतका मोठा गैरव्यवहार घडला आहे. त्यामुळे ही चौकशी होत असताना देखील त्यांनी मंत्रिपदावर राहणे योग्य नाही. त्यामुळे मी आज मुरलीधर मोहोळ यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी करत आहे, असं रवींद्र धंगेकर यांनी म्हटलं.

## ठळक बातम्या

### फ्रीज विक्रेत्याला आयोगाचा दणका


पुणे (आरंभ पर्व) : दुकानात प्रदर्शनासाठी (डिस्प्ले) ठेवलेला रेफ्रिजरेटर (फ्रीज) घेण्यास नकार दिल्यानंतरही ग्राहकाला 'डिस्प्ले'साठीचा फ्रीज नवीन म्हणून देण्यात आला. विक्रेत्याने केलेली ही कृती अनुचित व्यापाराचा एक प्रकार ठरतो. कंपनीने ग्राहकाला सदोष ग्राहक सेवा दिल्याने कंपनीने ग्राहकाला २५ हजार रुपयांची नुकसानभरपाई द्यावी, असा आदेश पुणे ग्राहक आयोगाने दिला. पुण्याच्या अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष डॉ. अरुण गायकवाड आणि सदस्या प्रणाली सावंत यांनी हा निकाल दिला. दसरा-दिवाळीच्या उत्सवानिमित्त खरेदीसाठी आलेल्या शिवाजीनगर येथील रहिवासी डॉ. विरेंद्र जाधवराव यांनी प्रदर्शनासाठी (डिस्प्ले) ठेवलेला रेफ्रिजरेटर (फ्रीज) दिल्याप्रकरणी ग्राहकाने कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व शोरूमच्या व्यवस्थापकाविरोधात ग्राहक आयोगाकडे दाद मागितली होती.

### चिमुकला १५ मिनिटांत सापडला

पुणे (आरंभ पर्व) : दिवाळीच्या लगबगीत आणि प्रवाशांच्या गर्दीत पुणे रेल्वे स्थानकावर एक सहा वर्षांचा चिमुकला हरवला. गर्दीत शोधूनही मुलगा सापडेना. अखेर मुलगा हरवला अन् आपल्यापासून कायमचा दूर गेला, या भीतीने सैरभैर झालेल्या आई-वडिलांनी गस्तीवर तैनात असलेल्या रेल्वे सुरक्षा बलाशी संपर्क साधला. गस्तीवरील निरीक्षकांनी तत्परता दाखवत सर्व यंत्रणा कामाला लावत अवघ्या 15 मिनिटांत मुलाला शोधून काढले. रेल्वे पोलिसांच्या प्रयत्नामुळे हरवलेला पोटचा गोळा परत मिळताच पालकांनी एकच हंबरडा फोडला. पुणे रेल्वे स्थानकावर ही घटना 19 ऑक्टोबरच्या रात्री, साडेअकराच्या सुमारास घडली. मेहबूबनगर (तेलंगणा) येथील रवी खेतावर, पत्नी पूजा आणि त्यांचा सहा वर्षांचा मुलगा अजय कन्याकुमारी एक्सप्रेसने निघाले होते. गाडी येईपर्यंत ते पुणे रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक 6 वरील एस्केलेटरजवळ उभे होते. रवी खेतावर तिकीट काढण्यासाठी गेले असता, सहा वर्षांचा चिमुकला अजय अचानक गर्दीत हरवला.

## राज्यात खासगी दस्तनोंदणी कार्यालयांना गती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने राज्यात 60 खासगी दस्तनोंदणी कार्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार येत्या सहा महिन्यांत ही कार्यालये सुरू होणार आहेत. तसेच, पहिल्या टप्प्यात पुणे, मुंबई या शहरात कार्यालये सुरू होणार आहेत. दरम्यान, जादा 6 हजार रुपये देऊन ग्राहकांना दस्तनोंदणी करता येणार आहे. राज्य शासनाने दस्तनोंदणीची सुविधा अधिक गतिमान करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्यात 60 खासगी कार्यालये सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. या कार्यालयांमधून पासपोर्ट कार्यालयात देण्यात येणाऱ्या सुविधा मिळणार आहेत. या सुविधा देताना नागरिकांकडून अतिरिक्त सेवा शुल्क आकारले जाणार आहे. हे शुल्क आता जास्तीत जास्त 6 हजार रुपये आकारण्यात येणार आहे. यासाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. कमीत कमी दर आकारणाऱ्या संस्थेला हे काम देण्यात येणार आहे, अशी माहिती नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून देण्यात आली. राज्य शासनाने दस्तनोंदणीची सुविधा अधिक गतिमान करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्यात 60 खासगी कार्यालये सुरू करण्याचा प्रस्ताव आहे. या कार्यालयांमधून पासपोर्ट कार्यालयात देण्यात येणाऱ्या सुविधा मिळणार आहेत. या सुविधा देताना नागरिकांकडून अतिरिक्त सेवा शुल्क आकारले जाणार आहे. हे शुल्क आता जास्तीत जास्त 6 हजार रुपये आकारण्यात येणार आहे. यासाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. कमीत कमी दर आकारणाऱ्या संस्थेला हे काम देण्यात येणार आहे, अशी माहिती नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून देण्यात आली.

## महिला विश्वचषकात आज भारताची बांगलादेशशी गाठ

### उपांत्य फेरीपूर्वी उणिवा दूर करण्यासाठी अखेरची संधी

● वेळ : दुपारी ३ वा. ●
● थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्टस १, २ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप ●

**नवी मुंबई (दै. आरंभ पर्व)**

उपांत्य फेरीपूर्वी खेळातील उणिवा दूर करण्यासाठी भारतीय महिला संघाला आज, रविवारी अखेरची संधी मिळणार आहे. महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील अखेरच्या साखळी लढतीत भारताची तुलनेने दुबळ्या बांगलादेशशी गाठ पडणार असून यावेळी भरीव सांघिक कामगिरीचा यजमानांचा प्रयत्न असेल.

नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर तीन दिवसांपूर्वी झालेल्या सामन्यात न्यूझीलंडला पराभूत करत भारतीय महिला संघाने उपांत्य फेरीतील स्थान निश्चित केले. आता याच मैदानावर भारतीय संघ आपला अखेरचा साखळी सामना खेळणार आहे. न्यूझीलंडविरुद्ध स्मृती मनधाना आणि प्रतिका रावल



या सलामीच्या फलंदाजांनी शानदार शतके झळकावली. त्यांच्या विक्रमी कामगिरीनंतर मुंबईकर जेमिमा रॉड्रिग्जनेही आक्रमक अर्धशतक साकारत भारताला भक्कम स्थितीत पोहोचवले. त्यानंतर न्यूझीलंडला पुनरागमन करणे जमले नाही. भारतीय संघाने याआधी सलग तीन सामन्यांत पराभव पत्करला होता. परंतु न्यूझीलंडविरुद्धच्या विजयाने भारतीय खेळाडूंचा आत्मविश्वास निश्चित उंचावला असेल. आता हीच लय बांगलादेशविरुद्ध कायम राखण्याचा भारताचा प्रयत्न असेल.

भारताला मनधाना वगळता अन्य फलंदाजांच्या कामगिरीची चिंता होती. मात्र, गेल्या दोन सामन्यांत मनधानासह कर्णधार हरमनप्रीत कौर, दीप्ती शर्मा, प्रतिका रावल आणि जेमिमा यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यामुळे भारताची ही चिंता दूर झाली आहे. परंतु गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणात अजूनही सुधारणेला वाव आहे. आता याच आघाडीवर अधिक चांगल्या कामगिरीचा भारताचा प्रयत्न असेल.






# गाझा पट्टी पुन्हा अशांत

गेल्या दोन दिवसांपासून गाझा पट्टी येथील इस्रायली सैनिकांनी तीव्र हल्ले तर केले असून युद्धविराम झाल्यानंतर जे शांततेचे वातावरण निर्माण झाले होते ते आता पार उद्ध्वस्त झाले आहे. युद्धविरामापूर्वी जवळपास गाझावासीयांना ६०० दिवस बॉम्बहल्ल्यांचा सामना करावा लागला होता. गाझामधील ४६,००० अधिक लोक मारले गेले आहे. त्या हिंसाचाराची पुन्हा आठवण ताजी व्हावी अशीच परिस्थिती सध्या गाझा पट्टीत आणि तेथील रफा परिसरात आहे. मारलेल्या लोकांपैकी १८,००० मुले आहेत. यावरून गाझामधील परिस्थिती किती भीषण आहे हे लक्षात यावे. अर्थात यास दोन्ही बाजू दोषी आहेत हे विसरून चालणार नाही. कारण एकीकडे हमास युद्धबंदी स्वीकारते पण तिचे पालन करत नाही आणि दुसरीकडे इस्रायली सैन्य तर याचीच वाट पाहत असते, की कधी युद्धंबंदी मोडता येईल. यात मानवतेचा मात्र मुडदा पडतो. गाझामध्ये शांतता करार अमलात आणायचा असेल तर तो पूर्णपणे आणि खऱ्या अर्थाने अमलात आला पाहिजे. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. आताची युद्धबंदी ही तात्पुरती आणि वरवरची होती. त्यातून खऱ्या अर्थाने शांतता प्रस्थापित झाली नाही. कायमची शांतता प्रस्थापित झाली तरच युद्धबंदीला काही अर्थ राहील. पण तसे होत नाही हे तर दुःख आहे. याला इस्रायल जितके दोषी आहे तितकेच हमासही आहे.

पॅलेस्टाईनचा गाझा भूमीवरील कब्जा हा अवैध असल्याने हा संघर्ष संपू शकत नाही असा पॅलेस्टाईनच्या पक्षपाती लोकांचा दावा असतो. पण ते हमासच्या अतिरेकी कारवायांकडे हेतूतः दुर्लक्ष करतात. हमास आणि इस्रायलने एकमेकांवर कराराचा भंग केल्याचा आरोप केला आहे, तर आपल्याला शांततेचे नोबेल पारितोषिक मिळावे म्हणून जो अट्टहास केला त्या ट्रम्प यांनी अजूनही गाझामध्ये युद्धबंदी कायम आहे असे म्हटले आहे. पण असे म्हणणे म्हणजे आत्मवंचना ठरेल. इस्रायली सैनिकांनी केलेल्या गोळीबारात ४ लोक ठार झाल्याचे म्हटले आहे. ट्रम्प यांच्या युद्धबंदी करारानंतर हा या भागातील संघर्षाचा सर्वात वाईट दिवस आहे असे जे म्हटले गेले ते अगदी रास्त



आहे. गेल्या आठवड्यात ट्रम्प यांनी इजिप्तमधील शर्म एल शेखमध्ये जागतिक नेत्यांसमोर बोलताना मध्यपूर्वेतील शांतता प्रस्थापित केली आहे असा दावा केला होता. पण त्या दव्याची शाई वाळतही नाही तोच इस्रायल आणि हमास यांच्यातील रक्तरंजित संघर्षात प्राणहानी झाल्याने युद्धबंदी मोडीत निघाल्याची बातमी ट्रम्प यांची विश्वासार्हता संपल्याची जाणीव करून देते. इस्रायली युद्धविमाने पुन्हा सक्रिय झाली आहेत आणि भविष्यात पुढे आणखी काय वाढून ठेवले आहे याची प्रचिती येते. हमासने अद्याप शस्त्रे हाती घेतलेली नाहीत तरीही अमेरिकेने युद्धबंदी कायम राहण्यासाठी या प्रांतात पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. कारण अमेरिका जेव्हा दुसऱ्या महायुद्धात उतरली तेव्हाच युद्धाचा निकाल लागला होता.

त्यामुळे आता ट्रम्प यांना केवळ युद्धबंदी कायम आहे असे म्हणून आपली जबाबदारी झटकता येणार नाही, युद्धबंदीचे उल्लंघन कुणी केले हा वादाचा प्रश्न आहे. कारण इस्रायली सैन्याने हमासने अगोदर युद्धबंदीचा भंग केल्याचा आरोप केला तर इस्रायली सैन्याने केवळ हमासच्या हल्ल्यांना उत्तर दिले असे म्हटले आहे. त्यामुळे या वादात न जाता आता शक्तिशाली लोकांनी यातून मार्ग काढावा आणि लोकांना शांततेच्या मार्गाने जाण्यास मदत करावी असाच सर्वसामान्य लोकांचा आग्रह आहे. हमास आणि इस्रायली सैनिक यातील कोण खोटे बोलत आहे हे सांगणे अवघड आहे. युद्धबंदीचे उल्लंघन झाले हे उघड आहे आणि ते कुणाच्या आगळीकीने झाले हे या क्षणी बाजूला ठेवले तरीही गाझामध्ये आजची वेळ अत्यंत चिंताजनक आहे हे निश्चित आहे. हमासने इस्रायलवर युद्धबंदी भंग केल्याचा आरोप करणे आणि इस्रायलने तसाच आरोप करणे यातून काहीही प्रश्न सुटणार नाही. गाझामधील निरपराध लोक मात्र मारले जात राहतील आणि त्यांना न्याय देणारा कुणी नसेल. कोणताही धर्म यात माघार घेण्यास तयार नाही. गप्पा मात्र सारे मानवतेच्या मारतात. पण मानवतेचा सर्वात जास्त मुडदा याच भूमीवर पडला आहे. हा इतिहास आहे.

त्यामुळे इस्रायल आणि पॅलेस्टिनी यांच्यातील या युद्धबंदीला अगोदरच ताण बसला होता. जराही हिंसक घटनेनंतर ती युद्धबंदी कोसळली आणि तीच आज शक्यता दिसत आहे. आता तर इस्रायलने गाझामध्ये मदत पाठवणे बंद केले आहे. दोन वर्षांच्या विनाशकारी संघर्षानंतर ट्रम्प यांच्या मध्यस्थीने शांतता प्रस्थापित झाली आणि हिंसाचार आटोक्यात आला होता, पण आता पुन्हा ते दिवस आता परतले आहेत. या पूर्वीही हमास आणि इस्त्रयायल यांच्यात युद्धबंदी लागू झाली होती.

पण ती अनेकदा तुटली तसेच यंदाही झाले. कारण अत्यंत घाईघाईने प्रश्नाचा साकल्याने विचार न करता ती अमलात आणली गेली, त्यामुळे युद्धबंदी तुटणारच होती. तसेच झाले आहे. युद्धविराम पार पाडण्यासाठी ट्रम्प यांच्याकडे दृढनिश्चय आहे का हा मूळ प्रश्न आहे. वाटाघाटी गंभीरपणे करण्याची अमेरिकेची म्हणजे ट्रम्प यांची खरोखर इच्छा आहे का हाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे.

युद्धबंदी यशस्वी होत नाही किंवा झाली नाही याला कारण आहे कारण ट्रम्प यांचे सर्व काही आपल्यालाच माहीत आहे असे वाटणारे धोरण. त्यांच्या दिखाऊपणाचे परिणाम दोन्ही बाजूंना भोगावे लागत आहेत हे वास्तव आहे.

इस्रायली नेतृत्व आणि हमासचे नेते यांच्याकडे वचनबद्धता असली तरीही त्यांच्याकडे असे काही स्पॉयलर गट आहेत की जे दृष्टिपथात असलेली शांतता प्रत्यक्षात येऊ देत नाहीत. आता ट्रम्प यांनी शांतता करार अमलात आणल्याबद्दल स्वतःची पाठ थोपटून घेतली असली तरीही मध्य पूर्वेत किंवा पश्चिम आशियात ट्रम्प यांचा प्रभाव पूर्वीसारखा राहिला नाही हेच वास्तविक कारण आहे. त्यामुळे शांतता करार होतील आणि ते काही काळ चालून मोडले जातील. सध्या गाझाची जनता मात्र वाऱ्यावर आहे आणि तिला वालीही कुणी उरलेला नाही हे सत्य आहे.



# नऱ्हे धायरी वडगाव परिसरातील सफाई कर्मचाऱ्यांना मिठाई वाटप

## गंगाधर भडावळे यांनी केले आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दिनांक २० ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी, मा. स्वीकृत नगरसेवक श्री. गंगाधर भडावळे यांच्या पुढाकाराने सिंहगड रोड, धायरी, नऱ्हे आणि वडगाव परिसरातील सफाई कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना मिठाई वाटप करण्यात आले. या उपक्रमातून सफाई कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करत दिवाळीचा आनंद सर्वांपर्यंत पोहोचविण्यात आला.

सफाई कर्मचाऱ्यांनी यावेळी भावनिक होत सांगितले "आमच्यासारख्या कामगारांचा सन्मान होतोय, हीच आमच्यासाठी खरी दिवाळी आहे. भडावळे साहेबांनी दिलेल्या आदरामुळे आम्हाला काम करण्याची नवचेतना मिळाली आहे."

कार्यक्रमादरम्यान परिसरात आपुलकीचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. गंगाधर भडावळे यांनी स्वतः उपस्थित राहून प्रत्येक कर्मचाऱ्याला मिठाई वाटली आणि सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

श्री. भडावळे म्हणाले, "स्वच्छतेसाठी दिवस-रात्र झटणारे सफाई कर्मचारी हे आपल्या समाजाचे खरे हिरो आहेत. त्यांच्या मेहनतीमुळे आपले शहर स्वच्छ आणि सुंदर राहते. दिवाळीच्या या मंगल प्रसंगी त्यांचा सन्मान करणं हीच खरी सेवा आहे."

या उपक्रमात, प्रतीक पोकळे, पप्पू पोकळे, अनंता भडावळे, तसेच संजीवनी योगा ग्रुपचे सदस्य उत्साहाने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन खडकवासल्याचे आमदार मा. भीमराव तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांनी दिलेल्या प्रेरणेमुळेच हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

यावेळी अन्वेष मांडलेकर (विरंगुळा केंद्र), खराडे (आरोग्य विभाग, पोकळे शाळा), गरड मुकादम आनंता, आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी मिळून समाजातील सफाई कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

# कचरा प्रश्नावर निलेश दमिष्टे यांनी लक्ष वेधले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे, धायरी आणि वडगाव परिसरातील कचऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे नागरिकांना असह्य दुर्गंधी, अस्वच्छता आणि आजारपणाचा सामना करावा लागत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही पुणे महानगरपालिका प्रशासनाने या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे सोशल मीडिया खडकवासला विधानसभा अध्यक्ष निलेश दमिष्टे यांनी खासदार सुप्रिया ताई सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढाकार घेतला आणि पुणे महानगरपालिका अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले होते. मात्र तरीही कचऱ्याचा प्रश्न सुटला नाही..

या आंदोलनाला नागरिकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून, परिसरातील अनेक रहिवासी, मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार आहेत. असे त्यांनी सांगितले. सोशल मीडियावरून निलेश दमिष्टे यांनी कचऱ्याची वस्तुस्थिती लोकांसमोर मांडली आहे. त्यांनी फोटो, व्हिडिओ आणि प्रत्यक्ष दृश्ये दाखवत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. त्यांनी प्रशासनाला आवाहन केले की - "कचऱ्याचे हे साम्राज्य नष्ट करून जनतेसाठी आरोग्यदायी आणि स्वच्छ वातावरण निर्माण करावे. नागरिकांचा संयम आता संपत चालला आहे." या सर्व घडामोडींमुळे नऱ्हे-धायरी-वडगाव परिसरात खळबळ उडाली असून, प्रशासनावर जबाबदारीची जाणीव निर्माण झाली आहे.



- **कचऱ्याचे साम्राज्य नष्ट करा! नागरिकांना आरोग्यदायी जीवन द्या; निलेश दमिष्टे**



# नऱ्हे-धायरी-वडगाव परिसरात दीपावली स्नेह मिलनाचा उत्साहमय सोहळा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नगरसेवक हरिदास कृष्णा चरवड मित्र परिवाराच्या वतीने दीपावलीच्या शुभप्रसंगी स्नेह मिलन समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक, कला, क्रीडा तसेच आरोग्य क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या उत्साहाने उपस्थित राहून आपला स्नेहभाव व्यक्त केला.

नऱ्हे, धायरी आणि वडगाव परिसरातील नागरिकांना एकत्र आणणारा हा स्नेह मेळावा अत्यंत आनंदी आणि आपुलकीच्या वातावरणात पार पडला. या प्रसंगी बोलताना माजी नगरसेवक हरिदास चरवड म्हणाले, "आजपर्यंतच्या माझ्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीत आपण सर्वांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. पुढेही अशीच साथ आणि पाठिंबा मिळावा, हीच माझी अपेक्षा आहे. दीपावलीच्या निमित्ताने सर्वांशी स्नेहसंवाद साधावा आणि एकमेकांशी नातं अधिक दृढ व्हावं, याच उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला आहे."



यावेळी डॉ . सुधाकरराव जाधवर सर,शहर भाजप उपाध्यक्ष सचिन मोरे, माजी स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे यांच्यासह राजकीय क्षेत्रातील विविध मान्यवर आणि नेतेमंडळी उपस्थित होते.

या स्नेहमेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी केदारनाना जाधव, चंद्रकांत पवळे, उमेश निजामपूरकर, दिग्विजय चरवड, नंदकिशोर गोसावी आणि अनंता कांबळे यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

एकतेचा, आपुलकीचा आणि स्नेहभावाचा दीप उजळवणारा हा स्नेह मेळावा सर्वांच्या मनात आनंदाचा झरा ठरला.

# शरीर सुखाची मागणी, विरोध करताच तरुणीचा खून

## आरोपीची गावातुन धिंड : नागरिकांमधून पोलिसांचे कौतुक व आभार

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

हवेली तालुक्यातील उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत वीस वर्षीय तरुणीच्या निर्घृण खुनाने हादरलेल्या उरुळी कांचन परिसरात आज पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत आरोपी दिनेश संजय पाटोळे (वय २६, रा. गोळेवस्ती, उरुळीकांचन, ता. हवेली, जि. पुणे) याची बाजारपेठेतून धिंड काढत खरी पोलीसगिरी दाखवली या कारवाईमुळे परिसरात मोठी चर्चा रंगली असून नागरिकांनी पोलिसांचे कौतुक केले जात आहे.

"उरुळी कांचन पोलिसांच्या या धडाकेबाज पावलामुळे परिसरात दहशत आणि नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे."



मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी कोरेगाव मूळ ग्रामपंचायत हद्दीत पायी चाललेल्या तरुणीला आरोपीने शरीर सुखाची मागणी केली होती त्याचा विरोध तरुणीने केल्याने २० वर्षीय तरुणीचा खून झाला असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे.

तरुणीचा खून झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणात उरुळी कांचन पोलिसांनी तत्परतेने तपास करून संशयित आरोपीला अटक केली. आज आरोपीला उरुळी कांचन गातुन व बाजारपेठेतून पोलिसांनी धिंड काढून जनतेसमोर उभं केलं, ज्यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून गुन्हेगारांना स्पष्ट इशारा मिळाला आहे की "अशा गुन्हेगारीला पोलिसांकडून अजिबात पाठीशी मिळणार नाही. धिंड काढताना पोलिसांनी बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या वेळी नागरिकांनी पोलिसांचा जयघोष केला व "उरुळी कांचन पोलिस जिंदाबाद" अशी चर्चा नागरिक करु लागले. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, "खुनासारख्या गंभीर गुन्ह्यांवर अशी ठोस कारवाई होत असल्याने गुन्हेगारांच्या मनात भीती निर्माण होईल आणि समाजात पोलीस दलाबद्दल विश्वास वाढेल.

**यावेळी उरुळी कांचन पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन वांगडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे, पो हवा प्रवीण चौधर, प्रशांत पवार, कमलेश होले, निलेश जाधव, पो कॉन्स्टे अमोल राऊत सोमनाथ सुपेकर, पो शि आशिष उल्हाकर, तात्याराव करे हे उपस्थित होते.**

## थोडक्यात पण महत्वाचे




### देहातची आकर्षक योजना - देहात ग्रेट गहू महोत्सवाचा दुसरा सिझन लाँच!

पुणे (आरंभ पर्व) : देशातील सर्वात मोठी कृषी तंत्रज्ञान कंपनी देहातने ग्रेट गहू महोत्सवाचा दुसरा हंगाम सुरू केला आहे. या योजनेअंतर्गत, देहातच्या संशोधन गव्हाच्या बियाण्या खरेदी केल्यावर एकूण २००१ विजेत्या शेतकऱ्यांना बोलेरो, ट्रॅक्टर आणि बुलेटसह आकर्षक भेटवस्तू मिळतील. गेल्या रब्बी हंगामात देशभरातील १.५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी या योजनेत भाग घेतला होता. त्यापैकी २,००१ विजेत्या शेतकऱ्यांना विशेष बक्षिसे देण्यात आली. योजनेचा सर्वोच्च पुरस्कार भोपाळच्या जितेंद्र मीना (गब्बर) यांना मिळाला, ज्यांनी महिंद्रा भूमीपुत्र ट्रॅक्टर जिंकला. दुसरा सर्वोच्च पुरस्कार, मारुती अल्टो, पटनाचे गोलू कुमार यांनी जिंकला. या प्रसंगी बोलताना, देहातचे सह-संस्थापक आणि सीओओ श्याम सुंदर सिंग म्हणाले, "गेल्या हंगामात शेतकऱ्यांनी देहातवर विश्वास दाखवला आणि योजनेत ज्या पद्धतीने सहभाग घेतला ते प्रशंसनीय आहे. आम्ही "ग्रेट गहू महोत्सवाचा" विजेत्यांना ट्रॅक्टर आणि अल्टो कार सारखी बक्षिसे दिली. आम्हाला शेतकऱ्यांकडून बियाण्यांबद्दल सकारात्मक प्रतिसाद मिळालाच नाही तर ते योजनेबद्दल खूप उत्साही देखील दिसत होते. या योजनेत सहभागी होणे खूप सोपे आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. शेतकऱ्यांना फक्त त्यांच्या जवळच्या देहात केंद्रावरून देहातचे संशोधन गहू बियाणे खरेदी करावे लागेल, त्यांचे लकी कूपन घ्यावे लागेल आणि योजनेसाठी नोंदणी करावी लागेल.

### एसयूडी लाइफने एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड केला लाँच

पुणे (आरंभ पर्व) : एसयूडी लाइफ इन्शुरन्सने एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड लाँच करण्याची घोषणा केली आहे, हा एक नवीन फंड ऑफर आहे जो निफ्टी अल्फा ५० इंडेक्सचा मागोवा घेते, भारतातील सर्वाधिक सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या शेअर्सची ओळख करून देणारा स्मार्ट बीटा बेंचमार्क आहे. नवीन फंड ऑफर (एनएफओ) ६ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत खुला आहे. हा निर्देशांक भारतातील सर्वात मोठ्या आणि सर्वाधिक तरल कंपन्यांमधील अव्वल ५० शेअर्सचा समावेश करतो. हे शेअर्स त्यांच्या "अल्फा"च्या आधारे निवडले जातात , जे त्यांच्या अल्फाच्या आधारे निवडले जातात, जे जोखीम समायोजित केल्यानंतर व्यापक बाजारपेठेपेक्षा चांगले प्रदर्शन करण्याची प्रत्येक स्टॉकची क्षमता मोजते. निर्देशांकातील प्रत्येक स्टॉकचे वजन त्याच्या अल्फा स्कोअरद्वारे निश्चित केले जाते, ज्यामुळे परिमाणात्मक विश्लेषणावर आधारित कामगिरी-केंद्रित पोर्टफोलिओ तयार होतो.

### भाजपा वैद्यकीय आघाडी हवेली तालुकाध्यक्ष डॉ. मच्छिंद्र काशिद



वाघोली (आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टीच्या वैद्यकीय आघाडीच्या हवेली तालुका अध्यक्षपदी डॉ. मच्छिंद्र काशिद यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे पत्र भारतीय जनता पार्टीचे पुणे जिल्हाध्यक्ष प्रदीप दादा कंद, उपाध्यक्ष प्रदीप दादा सातव यांच्या उपस्थितीत, तसेच हवेली तालुकाध्यक्ष विजय जाचक यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी विविध डॉक्टर उपस्थित होते. डॉ. काशिद यांच्या पक्षप्रवेशाने आणि नव्या जबाबदारीमुळे वैद्यकीय क्षेत्रातील ५० ते १०० डॉक्टर लवकरच भारतीय जनता पार्टीत प्रवेश करणार असल्याची माहिती डॉ. काशीद यांनी दिली दिली. यावेळी डॉ. बंडू कराळे, डॉ. नितीन पवार, डॉ. मनोज ठाकरे, डॉ. सतीश मेहरे, डॉ. संतोष खरात, डॉ. ज्ञानेश्वर खरात, डॉ. भरत शितोळे, डॉ. अतुल जाधव आणि डॉ. कपिल जुमले आदि उपस्थित होते. येणाऱ्या महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हवेली तालुक्यात वैद्यकीय आघाडीची मजबूत बांधणी आणि डॉ. मच्छिंद्र काशिद यांची निवड ही भाजपच्या संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वाची ठरणार असल्याचे मानले जात आहे.




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. २६ ऑक्टोबर २०२५









# रमेश गायकवाड यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

- जनसेवेला प्राधान्य मानणारा सच्चा कार्यकर्ता म्हणून रमेश गायकवाड यांची ओळख
- आ. भिमराव तापकीर यांच्याकडून रमेश गायकवाड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा.






**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला परिसरातील लोकप्रिय सामाजिक कार्यकर्ते व भाजपा ओबीसी मोर्चा शहर उपाध्यक्ष रमेश बापू गायकवाड यांचा वाढदिवस अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी परिसरातील नागरिक, मित्रपरिवार, समाजसेवक आणि सर्वपक्षीय मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. रमेश गायकवाड यांच्या मनमिळाऊ आणि लोकाभिमुख स्वभावामुळे कार्यक्रमस्थळी गर्दी उसळली होती.

या सोहळ्यात भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य राजाभाऊ जोर,भाजपा शहर उपाध्यक्ष सचिन मोरे, मनसे खडकवासला अध्यक्ष विजय मते, भाजप मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील, प्रदेश ओबीसी मोर्चा सचिव दत्ताभाऊ कोल्हे, मा. सरपंच संतोषदादा मते,सचिन दांगट, सुभाष नाणेकर, सारंग नवले, किशोर पोकळे, सागर भूमकर, शिवसेना ठाकरे गट नेते संदीप मते, सतीश कुटे, राजू कुटे,यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन रमेश बापू गायकवाड मित्रपरिवार यांनी केले होते, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक श्री. राज शिनारे यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते यांनी विशेष परिश्रम घेतले.

वाढदिवसाच्या औचित्याने सामाजिक जबाबदारी जपत गायकवाड यांनी गोशाळा व्यवस्थापनाला अकरा हजार रुपयांची मदत केली. त्यांच्या या संवेदनशीलतेचे उपस्थितांनी कौतुक केले. "वाढदिवस हे फक्त एक निमित्त आहे, समाजकार्याचा नवा संकल्प घेऊन मी पुढे चाललो आहे," असे गायकवाड यांनी भावनिक शब्दांत सांगितले.

तसेच त्यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानत दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

रमेश बापू गायकवाड हे खडकवासला परिसरातील जनतेच्या मनात स्थान मिळवणारे, संघर्षातून उभे राहिलेले आणि नेहमी सर्वांच्या सोबत असणारे व्यक्तिमत्व आहे.


त्यांचा वाढदिवस हा केवळ आनंदाचा क्षण नसून समाजसेवेचा एक प्रेरणादायी सोहळा ठरला.

खडकवासल्याचे लोकप्रिय आ. भीमराव तापकीर यांनी रमेश गायकवाड यांच्या घरी सदिच्छा भेट दिली. व वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. रमेश गायकवाड यांनी केलेल्या कार्याची आमदार तापकीर यांनी प्रशंसा केली. यावेळी खडकवासला भाजपा समन्वयक बाळासाहेब नवले,गंगाधर भडावळे उपस्थित होते.

## नागरिकांची मोठी गर्दी

**सामाजिक कार्यकर्ते शहर ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष रमेश गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त खडकवासला व परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली. रमेश गायकवाड हे त्यांच्या कामामुळे प्रसिद्ध असल्यामुळे त्यांचा मोठा जनाधार असल्याचे यानिमित्त जाणवले. त्यांनाशुभेच्छा देण्यासाठी दीपावलीचा सण असतानाही मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून त्यांच्यावरील प्रेम व्यक्त केले. आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीमध्ये रमेश गायकवाड यांच्याकडे ही सर्वांचे लक्ष असणार आहे. रमेश गायकवाड हे सामाजिक कार्यकर्ते असले तरीही सर्व पक्षांमध्ये त्यांच्याविषयी आकर्षण आहे. ते काय भूमिका घेतील याकडे सर्वांचे लक्ष लागणार आहे.**

# दिवाळी अंक वाचनातून बौद्धीक समृद्धी - शिंदे



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**


महाराष्ट्रात दरवर्षी प्रकाशित होत असलेल्या व समृद्ध परंपरा असलेल्या दिवाळी अंकाच्या वाचनातून बौद्धीक समृद्धी प्राप्त होत असल्याचे प्रतिपादन जलसंपदा विभागाचे उपविभागीय अधिकारी सचिन शिंदे यांनी येथे केले.

येथील सार्वजनिक वाचनालयात दिवाळी अंक २०२५ चे प्रदर्शन व उद्घाटन शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष प्रमोद गानू, मानद सचिव राजेंद्र सुतार, सुधाकर मिडगे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले, विविध विषयांवरील अंक वाचनातून बौध्दीक फराळ तर मिळतोच त्याच बरोबर मनोरंजनही होते. दिवाळी फराळा बरोबर दिवाळी अंक वाचनाची आपली परंपरा या वाचनालयाने जाणीवपुर्वक जोपासल्याचा अभिमान वाटतो व हि परंपरा वाचकांच्या भक्कम पाठिंब्यावर चालू राहिल असा विश्वास व्यक्त केला .

राजेंद्र सुतार यांनी भाषणात सांगितले की, वाचनालय दरवर्षी अत्यल्प वर्गणीतून वाचकासाठी विविध विषयांवरील २५० अंक वाचण्यासाठी उपलब्ध करून देत आहेत. अध्यक्ष प्रमोद गानू यांनी दिवाळी अंकासाठी जास्तीत जास्त वाचकांनी सभासद होण्याचे आवाहन केले. या प्रसंगी पवन कासवा, अॅड गणेश होनराव, वासंती बेलसरे, संतोष गाढवे, कल्पना गवळी, अरुणा चव्हाण, कल्याणी वालझाडे, श्रद्धा काळे, प्रिया देशपांडे, वसंत वाबळे, सुधाकर मिडगे, संतोष मांडेकर, सतिश दीक्षित व वाचनप्रेमी उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे

## सामाजिक कार्यकर्त्या मिनल देशमुख यांचे निधन



**पुणे (आरंभ पर्व) : सामाजिक कार्यकर्त्या आणि मराठी माझा अभिमान या संस्थेच्या संस्थापिका मिनल देशमुख यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्या ५६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात आई, भाऊ, भावजय व भाची असा परिवार आहे. येरवड्यातील वैकुंठात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सातत्याने समाजासाठी काही करण्याची ओढ मनात घेऊन मिनल देशमुख अखेरपर्यंत कार्यरत होत्या. सर्वांना एकत्र आणून सामाजिक सण, वाढदिवस, पारंपरिक उत्सव साजरे करण्यात त्यांचा पुढाकार असे. स्वामीभक्त असलेल्या मिनल शिस्तप्रिय, मेहनती आणि महत्त्वाकांक्षी होत्या. मराठी असण्याचा आणि मराठी संस्कृतीचा त्यांना प्रचंड अभिमान होता. मिनल देशमुख यांचा स्वभाव अतिशय स्पष्टवक्ती, परंतु ठाम मतवादी आणि सरळ होता. अनेकांसाठी त्या उत्तम मैत्रीण, मार्गदर्शक आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व होत्या. 'मराठी माझा अभिमान' या संस्थेमार्फत मराठी समुदायाला जोडण्याचे काम त्या करीत होत्या. मराठी भाषा आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी त्या झटल्या. साकोरेनगर आणि विमाननगर येथील लोकांच्या मनात त्यांच्या कार्याची अमिट छाप राहिली आहे. जवळजवळ १५ वर्ष साकोरेनगरमधील लाईट आणि पाण्याच्या विषयावर त्यांनी काम केले. बहुभाषिक असलेल्या या भागात 'दिवाळी पहाट' सारख्या उच्च दर्जाच्या उपक्रमाची सुरुवात केली. गेल्या दोन वर्षांपासून या सांगीतिक मैफलीला उदंड प्रतिसाद मिळत होता. त्यांच्या दूरदृष्टीमुळे ह्या कार्यक्रमांना समाजात विशेष ओळख मिळाली. त्यांच्या कार्याचा हा वारसा पुढे घेऊन जाणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली असेल, अशी भावना व्यक्त करण्यात येत आहे.**



## ऋषिकेश-प्राजक्ता रानडे यांच्या बहारदार गायनाने श्रोते मंत्रमुग्ध

**पुणे (आरंभ पर्व) : घन:शाम सुंदरा अरुणोदय झाला... गगन सदन तेजोमय... बगळ्यांची माळ फुले अजुनी अंबरात... पाहिले न मी तुला, तू मला न पाहिले... वेडात मराठे वीर दौडले सात... त्या तिथे पलिकडे माझिया प्रियेचे झोपडे... अशा एकापेक्षा एक सरस अजरामर गीतांनी दिवाळी पहाट रंगत गेली. श्रोत्यांची उत्स्फूर्त दाद अन 'वन्स मोअर' ची फर्माईश दीपोत्सवाचा आनंद द्विगुणित करणारी ठरली. निमित्त होते, मराठी माझा अभिमान असोसिएशनतर्फे विमाननगर येथील सिम्बायोसिसच्या सभागृहात आयोजित सुरमयी दिवाळी पहाट कार्यक्रमाचे! प्रसिद्ध गायक ऋषिकेश रानडे आणि गायिका प्राजक्ता रानडे यांनी सुमधुर सादरीकरण, तर मिलिंद कुलकर्णी यांचे ओघवते निवेदन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.**

# गुळाणी येथील पानंद रस्ता खुला

**किरण खुडे**



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्याच्या पुर्व भागतील गुळाणी येथील वाकळवाडी रस्ता ते गुळाणकर वस्ती हा दिड किलोमीटर लांबीचा पानंद रस्ता खुला करण्यात आला. लोकसहभाग व वर्गणीतून या रस्त्याचे काम शेतकऱ्यांनी पूर्ण केले. या पानंद रस्त्याचा परीसरातील जवळपास शंभरहुन अनेक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल सप्ताहात शिव पानंद रस्ते खुले करावे असे शासनाच्या वतीने आदेश होते. यामध्ये खेड तालुक्यातील गावोगावचे पानंद रस्ते शेतकऱ्यांच्या संमतीने खुले करण्यात आले. त्यानुसार गुळाणी (ता.खेड ) येथील वाकळवाडी रस्ता ते गुळाणकरवस्ती हा पानंद रस्ता अनेक वर्षांपासून बंद होता. त्यामुळे या हद्दीतील अनेक शेतकऱ्यांना शेतीमाल नेण्यास अडचण होती. या रस्त्यासाठी येथील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन लोकसहभागातून या पानंद रस्त्याचे काम पूर्ण केले. त्यामुळे या ठिकाणच्या शेतकऱ्यांचा शेती मालाच्या वाहतुकीचा व येण्याजाण्याचा प्रश्न सुटला असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

शासनाच्या धोरणानुसार या पानंद रस्ता खुला झाल्याने येथील शेतकऱ्यांना फायदा झाला आहे. हा रस्ता मुरूम टाकून पूर्ण करण्यात आला यासाठी येथील शेतकरी व दानशुर ग्रामस्थ यांचे सहकार्य मिळाले. शेतकऱ्यांच्या सहमतीने पानंद रस्ता खुला झाल्याने या विभागाचे मंडलअधिकारी, कामगार तलाठी, माजी सरपंच, उपसरपंच व शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.




### पहिल्यांदाच कर्ज घेणाऱ्या ग्राहकांपर्यंत डिजिटल बँकिंग सेवा आणत

# 'हॅलो उज्जीवन' ॲपद्वारे ६९० कोटी रु. चे आर्थिक व्यवहार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेच्या मायक्रोबँकिंग ग्राहकांसाठी खास तयार केलेल्या मोबाईल बँकिंग प्लॅटफॉर्म 'हॅलो उज्जीवन' ला सुरुवात झाल्यापासून आजपर्यंत 690 कोटी रु.चे आर्थिक व्यवहार पार पडले आहेत. बहुतांशी प्रथमच डिजिटल बँकिंगचा वापर करणाऱ्या समूह आणि वैयक्तिक कर्ज घेणाऱ्या मायक्रोफायनान्स ग्राहकांसाठी तयार केलेले हे ॲप आर्थिक व्यवहारापासून दूर असणे आणि आर्थिक सक्षमीकरण यांच्यातील महत्त्वाचा दुवा ठरले आहे.

UJJIVAN
UJJIVAN SMALL FINANCE BANK
Build a Better Life

13 लाखांहून अधिक डाउनलोडसह, हॅलो उज्जीवनने आपल्या मायक्रोबँकिंग ग्राहकांमध्ये सखोल सहभाग मिळविला आहे. त्यापैकी 98 टक्के महिला ग्राहक असून सरासरी वापरकर्त्याचे वय 35 वर्षे आहे. ॲपद्वारे 277 कोटी रु. च्या कर्ज परतफेडी, 358 कोटी रु. च्या ठेवी (फिक्स्ड आणि रिकरिंग डिपॉझिट अकाउंट्स), 34 कोटी रु. चे वैयक्तिक कर्ज वितरण तसेच 2.4 कोटी रु. च्या 36,000 हून अधिक हॉस्पीकेअर विमा खरेदी यांना सहाय्य मिळाले आहे. याशिवाय, पाच लाखांहून अधिक कर्ज वितरण पावत्यांचे डिजिटल पोहोच पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने होत असून त्यामुळे ग्राहकांना बँकेत प्रत्यक्ष भेट देण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. भौतिक व्यवहारांपासून डिजिटल व्यवहारांकडे झालेला हा बदल पारंपरिक बँकिंग तंत्रज्ञानाशी अपरिचित असलेल्या ग्राहकांमध्ये मोठा वर्तनात्मक बदल दर्शवतो.

"भारताचे पहिले व्हॉईस-व्हिज्युअल-व्हर्नॅक्युलर मोबाइल बँकिंग ॲप" म्हणून ओळखले जाणारे हॅलो उज्जीवन हे उपलब्धतेला केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात आले आहे. या ॲपमध्ये आवाजावर आधारित सहाय्य, दृश्यात्मक दिशादर्शन आणि 11 भारतीय भाषांमधील बहुभाषिक सुविधा (हिंदी, मराठी, बंगाली, तमिळ, गुजराती, कन्नड, मल्याळम, पंजाबी, आसामी, ओडिया आणि इंग्रजी) उपलब्ध आहे. वाचनक्षमता आणि भाषेच्या अडथळ्यांना दूर करून, हे ॲप ग्राहकांना त्यांच्या पसंतीच्या भाषेत आणि पद्धतीत कर्ज मंजूर झाल्याची पावती, परतफेड, बचत आणि विमा यांसारख्या मूलभूत बँकिंग सेवा स्वतंत्रपणे करण्यास सक्षम करते. ॲप पूर्ण वैयक्तिक कर्ज प्रवास, पूर्व-मंजूर आणि टॉप-अप वितरण, NEFT आणि IMPS द्वारे 20 कोटी रु. पेक्षा अधिक व्यवहार, तसेच डिजिटल दीक्षा (Digital Diksha) या वैशिष्ट्याद्वारे आर्थिक साक्षरतेला चालना देते. डिजिटल दीक्षा सेवेपासून वंचित ग्राहक वर्गाला त्यांचे आर्थिक उद्दिष्ट नियोजित पद्धतीने गाठायला मदत करते. रिअल-टाइम प्रगती ट्रॅकिंग आणि स्मरणपत्रे देते आणि दीर्घकालीन आर्थिक शिस्तीला प्रोत्साहन देते. उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेच्या मायक्रो बँकिंग आणि गोल्ड लोनचे प्रमुख विभास चंद्रा म्हणाले, "हॅलो उज्जीवन चा अवलंब ही आमच्या मायक्रोबँकिंग ग्राहकांच्या खऱ्या आर्थिक सक्षमीकरणाची पावती आहे. याची सोपी रचना, मजबूत सुरक्षा वैशिष्ट्ये आणि विस्तृत सेवा श्रेणीमुळे ग्राहक आत्मविश्वासाने ॲप वापरत आहेत. हॅलो उज्जीवन वर त्यांनी दाखवलेला विश्वास डिजिटल बँकिंगविषयी त्यांचा वाढता आत्मविश्वास दर्शवतो आणि त्यांच्या आर्थिक स्वास्थ्यावर अधिक नियंत्रण ठेवण्यास मदत करतो. यातून आम्हाला ॲपची कार्यक्षमता अधिक वाढवण्यास प्रोत्साहन मिळते."

सध्याच्या यशावर आधारित उज्जीवन एसएफबी आर्थिक वर्ष 26 पर्यंत ग्राहकांना सोयीचे पडावे यासाठी, सहभाग अधिक मजबूत करण्यासाठी आणि तळागाळातील ग्राहकांमध्ये डिजिटल स्वीकृती वाढविण्यासाठी नवीन वैशिष्ट्यांची मालिका सादर करण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे. हॅलो उज्जीवन च्या यशस्वी कामगिरीला उद्योगक्षेत्रातील अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले असून ग्राहक विभागातील डिजिटल दरी कमी करण्याच्या प्रयत्नांचा सन्मान करण्यात आला आहे. या पुरस्कारांमध्ये 2023 मध्ये MEITY द्वारे मान्य ग्राहक तंत्रज्ञानातील नाविन्यपूर्णता यासाठी एजीस ग्राहम बेल अॅवार्ड, आर्थिक वर्ष 24 मध्ये डिजिटल कन्झ्युमर ॲप्लिकेशन साठी SKOCH अॅवार्ड, आर्थिक वर्ष 24 मध्ये टेक्नोलॉजी इनोव्हेशन साठी बिझनेस टुडे बेस्ट बँक अॅवार्ड आणि Massachusetts Institute of Technology द्वारे चालविलेले सामाजिक प्रभाव नाविन्यपूर्णता यासाठीचे जागतिक व्यासपीठ MIT Solve आर्थिक वर्ष 24 येथे फायनलिस्ट म्हणून निवड यांचा समावेश आहे. बँक आता हॅलो उज्जीवन ला संकलन कार्यक्षमता, कर्ज वितरण आणि क्रॉस-सेल संधी यांसाठी डिजिटल साधन म्हणून विस्तारण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. ग्राहकांच्या आर्थिक वर्तनात बदल घडविण्यातील या ॲपच्या यशामुळे ते सर्वसमावेशक डिजिटल बँकिंगच्या ध्येयासाठी एक आदर्श मॉडेल ठरले आहे.

# नात्यापलीकडे जाऊन मुलींनी एकमेकींना सहाय्य करावे

## अमेरिकास्थित उद्योजक गायतोंडे दांपत्याची भावना; विद्यार्थी साहाय्यक समितीच्या मुलींच्या नूतन वसतिगृहाचे उद्घाटन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्राईड ऑफ ओनरशिप, अशी अभिमानाची भावना विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थ्यांमध्ये मला जाणवली. मुलींनी याच भावनेने सदैव एकमेकींच्या साह्यासाठी तत्पर असले पाहिजे. नाते असो वा नसो, स्त्री या एकाच नात्याचा विचार करून साह्य केले पाहिजे. व्यक्तीच्या यशामागे अनेक घटक असतात. माझ्या आईचे असेच स्थान माझ्या आयुष्यात आहे. तिचे नाव नूतन वसतिगृहाला दिले आहे, याचे समाधान वाटते, असे मनोगत अमेरिकास्थित उद्योजक दांपत्य विभावरी आणि गिरीश गायतोंडे यांनी सोमवारी येथे व्यक्त केले.

निमित्त होते, विद्यार्थी साहाय्यक समितीच्या पुण्यातील मुलींसाठीच्या नूतन वसतिगृहाच्या उद्घाटन सोहळ्याचे. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ उद्योजक आणि समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार होते. अमेरिकास्थित देणगीदार विभावरी आणि गिरीश गायतोंडे यांच्या हस्ते श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे मुलींचे वसतिगृह या नूतन वास्तूचे उद्घाटन साजरे झाले.

सेनापती बापट रस्त्यावरील शिवाजी हौसिंग सोसायटीशेजारील लजपत संकुल येथे हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, कायम विश्वस्त भाऊसाहेब जाधव, मकरंद फडके, तुकाराम गायकवाड, संजय अमृते, रत्नाकर मते, प्रभाकर पाटील, चंद्रकांत कुलकर्णी, दुर्गेश पवार अन्य सल्लागार, पदाधिकारी, हिंतचिंतक उपस्थित होते. मनोगत मांडताना विभावरी गायतोंडे म्हणाल्या, 'अच्युतराव आपटे यांच्यापाशी असलेली दृष्टी आणि त्यांचा ध्यास महत्त्वाचा आहे. प्राईड आफ ओनरशिप, ही अभिमानाची भावना, येथील विद्यार्थ्यांमध्ये मला जाणवली. भगिनीभाव (सिस्टरहूड) आणि मैत्री, स्त्रियांमध्ये एकमेकींसाठी सदैव असली पाहिजे. नाते असो वा नसो, स्त्री या एकाच नात्याचा विचार करत, एकमेकींसाठी उभे राहिले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. गिरीश गायतोंडे म्हणाले, प्रत्येक व्यक्तीच्या यशामागे तो एकटा नसतो. कुटुंबासह इतरही अनेक घटक असतात. माझ्यासाठी ते स्थान आई लतिका गायतोंडे यांचे आहे. या वसतिगृहाला तिचे नाव दिले आहे. समितीच्या माध्यमातून विद्यार्थिनींसाठी चालणारे हे कार्य पाहून तिला समाधान वाटेल, असा विश्वास मला वाटतो.

प्रतापराव पवार म्हणाले, विद्यार्थी हाच केंद्रबिंदू ठेवत, नीतिमत्ता, पारदर्शकता आणि जबाबदारी मानून, अखंडित कार्यरत असणारी विद्यार्थी साहाय्यक समितीसारखी संस्था देशात दुसरी नसेल. उत्तम विद्यार्थी घडवून उत्तम समाजाच्या निर्मितीसाठी समिती कटिबद्ध आहे, सदैव राहील. समितीचा केंद्रबिंदू सुरवातीपासून विद्यार्थी हाच आहे, यापुढेही राहील. काळानुरुप शिक्षण, कौशल्य विकास करता यावा, त्यातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि त्यांच्यासाठी नव्या संधी तयार व्हाव्यात, हाच उद्देश आहे. समितीच्या माजी विद्यार्थ्यांनी समितीच्या प्रत्येक कार्याला लावलेला हातभार, दिलेले योगदान पाहता हा उद्देश सफल होत आहे. शिकण्याची आस असलेल्या प्रत्येकाला शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे, या हेतूने समितीचे कार्य सुरू आहे आणि सदैव सुरू राहील.

यशोदा आपटे म्हणाल्या, समितीच्या धुरंधरांचे कार्य पाहिले, की आम्ही कस्पटासमान आहोत, असे वाटते. समिती १९५५ साली स्थापन झाली. मी स्वतः १९६१ साली अभियांत्रिकी पदवीधर झाले. आयआयटीमधून उच्चशिक्षण, पीएचडी आणि मग अध्यापन, केले. पण समितीने उभे केलेले कार्य विलक्षण आहे.

**मकरंद फडके यांनी प्रास्ताविकात समितीचे संस्थापक अच्युतराव आपटे यांच्या स्वप्नाची पूर्ती झाल्याची भावना व्यक्त केली. समितीच्या वसतिगृहात किमान एक हजार विद्यार्थिनींची सोय झाली पाहिजे, अशी त्यांची इच्छा होती. आज समितीच्या वसितगृहात ८०० विद्यार्थिनी आहेत. देणगीदारांमुळेच यासाठीचे निधी संकलन शक्य झाले. नूतन वसतिगृहाचे देणगीदार गायतोंडे दांपत्याला असलेली सामाजिक प्रश्नांची जाण, सामाजिक दायित्वाची भावना आणि चांगल्या कार्याला सर्वतोपरी साह्य करण्याची भूमिका, महत्त्वाची ठरल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी वसतिगृहाचे विविध देणगीदार, सीएसआर उपक्रमातून साह्य करणारे हितचिंतक, इमारतीच्या प्रत्यक्ष उभारणीत योगदान देणारी मंडळी, सर्वांचा पदाधिकार्यांच्या हस्ते कृतज्ञता सत्कार करण्यात आला. समितीच्या २०२४-२५ त्या वार्षिक अहवालाचे प्रकाशनही करण्यात आले. समितीच्या वसतिगृहात विद्यार्थिनी म्हणून वास्तव्य केलेल्या आणि पुढे कर्तृत्वाचे क्षितिज विस्तारणार्या स्नेहा फडके, अश्विनी सानप, डॉ. संगीता बर्वे, गायत्री पाठक आणि सुरेखा भणगे यांचा प्रातिनिधिक गौरव करण्यात आला. जगदीश दिवेकर यांनी यावेळी समितीला १० लाख रुपयांची देणगी दिली. विश्वस्त प्रीती राव यांनी परिचय करून दिला. विश्वस्त तुकाराम गायकवाड यांनी आभार मानले, तर विनया देसाई यांनी सूत्रसंचालन केले. समितीच्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन तसेच पसायदान सादर केले.**

---

## थोडक्यात पण महत्वाचे

### 'तू माझा किनारा'चा भावनिक प्रवास सुरू ३१ ऑक्टोबरपासून!



**पुणे (आरंभ पर्व) : गेल्या महिनाभरापासून प्रेक्षकांच्या उत्सुकतेच्या केंद्रस्थानी असलेला 'तू माझा किनारा' हा मराठी चित्रपट आता अखेर प्रेक्षकांसमोर येण्यासाठी सज्ज झाला आहे. या चित्रपटाची प्रदर्शन तारीख ३१ ऑक्टोबर २०२५ अशी जाहीर करण्यात आली आहे. वडील आणि मुलीच्या नात्याचा भावस्पर्शी प्रवास दाखवणाऱ्या या चित्रपटाचा ट्रेलर काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला होता आणि त्याला प्रेक्षकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. अनेकांनी सोशल मीडियावर या ट्रेलरचे कौतुक करत, कथेत दडलेले भावविश्व आणि अभिनयाची ताकद अधोरेखित केली आहे. आता सर्वांनाच या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहायची कारणं मिळाली आहेत. 'तू माझा किनारा' ही कथा आहे प्रत्येक वडिलांची, ज्यांना आपल्या मुलीबद्दल खूप सांगायचं असतं पण शब्द सापडत नाहीत आणि प्रत्येक मुलीची, जी आपल्या बाबांना समजून घ्यायचा प्रयत्न करत राहते. ही कथा आहे एका अशा कुटुंबाची, जे प्रेम, संघर्ष आणि समजुतीच्या दरम्यान स्वतःचा "किनारा" शोधतं. हा सिनेमा केवळ बाप लेकिच्या नात्याची कथा नाही, तर प्रत्येक घरात घडणारी गोष्ट आहे. आई वडील, मुलं, त्यांच्या भावना, छोट्या-छोट्या गोष्टींवरून होणारे वाद आणि न बोलता उमटणारे प्रेम, हे सगळं 'तू माझा किनारा'च्या प्रत्येक क्षणात जाणवतं.**

---

## "वाघोलीला डर्टी कोणी केलं?" रामकृष्ण सातव पाटील यांचा आयुक्तांना सवाल



**वाघोली (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी नुकताच वाघोली परिसराचा दौरा केला,यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की"माझ्या मते पुण्यात सर्वात डर्टी भाग वाघोली आहे," आता पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी केल्यानंतर या वक्तव्यावरून वादंग निर्माण झाला आहे. या विधानावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक , तथा वाघोलीचे माजी उपसरपंच रामकृष्ण सातव पाटील यांनी आयुक्तांना थेट सवाल केला आहे "वाघोलीला डर्टी कोणी केलं?"

रामकृष्ण सातव पाटील यांनी सांगितले की, "२०२१ साली वाघोली ग्रामपंचायतीकडे स्वच्छतेसाठी तब्बल ५४ कर्मचारी, २५ कचरा गाड्या, ट्रॅक्टर, जेसीबी, ३५ कंटेनर आणि २ टेम्पो अशी मोठी यंत्रसामग्री होती. त्या काळात वाघोली महाराष्ट्रातील सर्वात सक्षम आणि कार्यक्षम ग्रामपंचायतीपैकी एक म्हणून ओळखली जात होती."मात्र "महानगरपालिकेत समावेश झाल्यानंतर वाघोलीच्या विकासाला अक्षरशः खीळ बसली. रस्त्यांची दुर्दशा, कचऱ्याचे ढीग, गटारांच्या समस्या आणि नियोजनशून्य कामामुळे आज वाघोलीची परिस्थिती बिकट झाली आहे. मग अशा स्थितीत 'वाघोली डर्टी आहे' असं म्हणणं म्हणजे स्वतःच्या प्रशासनिक अपयशाकडे दुर्लक्ष करणं होय."

तसेच स्थानिक रहिवाशांनीही देखील आयुक्तांच्या विधानावर नाराजी व्यक्त केली असून, "स्वच्छतेसाठी निधी आणि मनुष्यबळ असूनही कामात ढिलाई होत आहे," असा आरोप केला आहे. वाघोली परिसरातील वाढती लोकसंख्या, अनियंत्रित बांधकामं आणि पायाभूत सुविधांची कमतरता यामुळे नागरिकांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे आयुक्तांच्या वक्तव्यानंतर वाघोलीच्या विकासाच्या प्रश्नावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

---

## एसटी प्रवासी महिलेकडील दागिने चोरणाऱ्या तिघी अटकेत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दिवाळीत परगावी निघालेल्या एसटी प्रवासी महिलेकडील दागिने चोरणाऱ्या तीन महिलांना गुन्हे शाखेने अटक केली. त्यांच्याकडून रोकड, तसेच सोन्याचे दागिने असा चार लाख १२ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. आशा देविदास लोंढे (वय ६०), रेखा मनोहर हातागंळे (वय ३५) आणि हेमा दिगंबर हातागंळे (वय ४१, तिघी रा. लोणी काळभोर रेल्वे स्थानकाजवळ) अशी अटक करण्यात आलेल्या महिलांची नावे आहेत. दिवाळीत मुंबई-पुणे रस्त्यावरील वाकडेवाडी एसटी स्थानकातून परगावी निघालेल्या प्रवाशांकडील दागिने, रोकड चोरीला गेल्याच्या घटना घडल्या होत्या. गुन्हे शाखेच्या युनिट चारकडून चोरट्यांचा शोध घेण्यात येत होता. प्रवाशांकडील ऐवज चोरणाऱ्या महिला वाकडेवाडी येथील पीएमपी थांब्यावर थांबल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तिघींना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली. तेव्हा त्यांनी एसटी प्रवासी महिलेच्या पिशवीतून दागिने चोरल्याची कबुली दिली. तक्रारदार महिला नाशिकहून सांगलीकडे निघाली होती. वाकडेवाडी एसटी स्थानकात उतरल्यानंतर ती पीएमपी बसने कात्रजकडे निघाली होती.

---

## प्रभाग आरक्षण सोडत चक्राकार पद्धतीने झाली नसल्याचा आरोप

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

येथील राजगुरुनगर नगरपरिषदेतील प्रभाग आरक्षण सोडत चक्राकार पद्धतीने झाली नसल्याचा आरोप भीमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष, तथा राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक विजय डोळस यांनी केला आहे. चुकीच्या आरक्षण सोडतीविरोधात त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे.

विजय डोळस यांनी सांगितले की, राजगुरुनगरमध्ये सन २०१४ मध्ये नगरपरिषद अस्तित्वात आली. त्यानंतर होणारी ही दुसरी निवडणूक आहे. शहरातील प्रभाग क्र. १० मध्ये सन २०१४ ला अनुसूचित जाती महिला आरक्षण होते. नव्याने नुकतीच आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यात पुन्हा याच प्रभागात अनुसूचित जाती आरक्षण आले आहे. चक्राकार पद्धतीने व प्रभागातील अनुसूचित जाती लोकसंख्या दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या प्रभागात हे आरक्षण यायला हवे होते. मात्र, तसे घडलेले नाही. यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मतदार नागरिकांवर अन्याय होत आहे. त्यामुळे याचिका दाखल केली असल्याचे विजय डोळस त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, राजगुरुनगर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अंबादास गरकळ याविषयी म्हणाले, शहरातील प्रभाग क्रमांक १० मध्ये अनुसूचित जातीचे आरक्षण पुन्हा आले आहे.

---

## सुट्ट्यांमुळे पर्यटकांनी फुलला लोणावळा, खंडाळा परिसर



**लोणावळा (दै. आरंभ पर्व)**

लोणावळा, खंडाळा परिसर सध्या पर्यटकांनी फुलला आहे. याशिवाय, लगतच्या स्थळांनाही भेटी देणाऱ्यांची संख्या वाढली आहे. शाळांना दिवाळीच्या सुट्ट्या आणि वीकेंडमुळे शनिवारी मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाल्याचे दिसून आले.

लोणावळ्यासह कार्ला परिसर व आई एकवीरेच्या दर्शनासाठी भाविक, पर्यटक वेहेरगाव येथील एकवीरा गडावर दाखल झाले आहेत. गर्दीने बाजारपेठ गजबजलेली पाहायला मिळत आहे. परिसरातील भाजे लेणी, लोहगड, विसापूर किल्ले, जलक्रीडा ठिकाणांसह पवना परिसर व मावळात पर्यटकांचा ओघ वाढला आहे. पर्यटकांच्या वाहनांची संख्या वाढल्याने द्रुतगती मार्गावरील बोरघाटात दस्तुरीजवळ पुण्याकडे येणारी वाहतूक सावकाश सुरू होती.वेहेरगाव, लोणावळा याठिकाणी काही काळ वाहनांच्या रांगा लागल्या. दिवाळी सुट्यांमुळे देशभरातील विशेषतः गुजरात, मुंबई येथील पर्यटकांचा ओघ वाढला वाढत आहे. गेली काही वर्षे दिवाळीनंतर हा 'ट्रेंड' सुरू झाला आहे, अशी प्रतिक्रिया व्यावसायिक समीर इंगळे यांनी दिली.

लोणावळा परिसरात शनिवारी दुपारनंतर मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. यामुळे पर्यटकांची काहीशी तारांबळ उडाली. या 'ऑक्टोबर हीट'चा त्रास कमी होऊन पर्यटकांना सुखद गारवा अनुभवता आला.

---

## AXA चा पाठिंब्याने २०३० सालापर्यंत भारतात सुमारे १०,००० मुलींना मिळणार स्टेम शिक्षण




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

AXA ने आज आपली स्टेम (सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनियरिंग आणि मॅथेमॅटिक्स) शिक्षणाप्रती असलेली बांधिलकी जपत, आपल्या "डेअर टू थ्राईव" उपक्रमांतर्गत २०३० साला पर्यंत भारतातील वंचित पार्श्वभूमी असलेल्या १०,००० मुलींना याचा लाभ मिळवून देण्याची घोषणा केली.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून, AXA ग्लोबल बिझनेस सर्व्हिसेस, या क्षेत्रातील भागीदार आणि एनजीओ'ज चा मदतीने तरूण मुलींपर्यंत पोहोचून त्यांना स्टेम शिक्षण घेण्याकरिता प्रोत्साहन आणि प्रशिक्षण देऊ करेल, ज्याकरिता विविध शिष्यवृत्ती अनुदान, संगणक प्रयोशाळा निर्मीती आणि डेक्स्टॉप संगणकांचे वाटप अशा काही गोष्टी करण्याचा त्यांचा मानस आहे. कंपनीने आजच आपली पुण्यातील फ्रेन्ड्स युनियन फ़ॉर इंजिनियरिंग (FUEL) नामक संस्थेसह झालेली भागीदारी देखील जाहिर केली, ज्यांचा माध्यमातून AXA समूहाला झालेल्या ४० वर्षांचा आनंद साजराकरण्याकरिता बेंगलुरू आणि पुण्यातील ४० मुलींना स्टेम शिक्षणाकरिता सहाय्य केले जाईल. गेल्याकाही वर्षात AXA ग्लोबल बिझनेस सर्व्हिसेसने सुमारे २,५०० मुलींना औद्योगिक भागीदारीचा माध्यमाने भक्कम असा आधार देऊन सबळ बनविले आहे आणि यापुढे देखील या दिशेने अधिक जोमाने कार्य करण्याचे ठरविले आहे."

"डेअर टू थ्राईव" उपक्रमाची सुरवात AXA समूहाचा कार्यकारी समूहाचे चीफ़ ऑपरेटिंग ऑफ़िसर आणि सीईओ ॲलेक्झॅन्डर व्होलर्ट, बेंगलुरू मधील फ्रान्स काऊन्सिलचे जनरल मार्क लॅमी आणि AXA ग्लोबल बिझनेस सर्व्हिसेसचा सीईओ मिशेल रोशफ़ोर्ट यांनी AXA GBS चा बेंगलुरू कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात केली. AXA ग्लोबल बिझनेस सर्व्हिसेस येथे, समावेशन पद्धतीने दैनंदिन कामे व्हायला हवी याकरिता मार्गदर्शन केले जाते, सामाजिक आणि आर्थिक आव्हानांना सामोरे जाणाऱ्या व्यक्तींना त्यांचा संपूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यासाठी पाठिंबा दिला जातो, आणि हे सगळं करताना संरक्षण हा विशेषाधिकार नसून सर्वांचाच हक्क आहे याची देखील खात्री दिली जाते. शिक्षण, डिजिटल सबळीकरण आणि समाजातील सहाय्याने , कंपनी विकासाची गती वाढविण्याचा प्रयत्न करते आणि याकरिता अतीशय गरज असलेल्यांना संधी देखील निर्माण करून दिल्या जातात. विमा क्षेत्रातील एक अग्रगण्य कंपनी म्हणून, AXA समूह AXAग्लोबल बिझनेस सर्व्हिसेससारख्या विविध विभागांचा माध्यमातून समाजाचे सबळीकरण करण्यास समर्पित आहे तसेच आमचा सामाजिक जबाबदाऱ्यांची रचना ही परोपकारी कल्पकतांची एक प्रयोग शाळा असल्याचे देखील आम्ही समजतो. पुढील ५ वर्षांकरिता वंचित पार्श्वभूमी असलेल्या १०,००० पेक्षा अधिक मुलींना स्टेम शिक्षण प्रदान करण्याचा आमचा ध्येयामुळे आम्ही सामाजिक बदल घडावे म्हणून हे आमचे योगदान असल्याचे समजतो आणि यामुळे मुलींचा शिक्षणाकरिता एक अधिक समावेशक असे जग निर्माण होण्यास मदत मिळेल आणि त्यांना रोजगार मिळण्याकरिता त्या सुसज्ज देखील असतील. "जे महत्वाचे आहे त्याचे रक्षण करा" : हाच AXA चा मनात खोलवर रूजलेला भाव आहे," असे AXA ग्रुप ऑपरेशन्सचे ग्रुप चीफ़ ऑपरेटिंग ऑफ़िसर आणि सीईओ असलेले ॲलेक्झॅन्डर व्होलर्ट म्हणाले.

AXA ग्लोबल बिझनेस सर्व्हिसेसचा सीईओ, मिशेल रोशफ़ोर्ट म्हणाल्या, " आपल्या सभोवतालचा समाजामध्ये बदल घडवून आणण्याकरित एकी सगळ्यात महत्वाची असते यावर आमचा विश्वास आहे आणि हजारो तरुणींचे जीवन बदलण्याकरिता "डेअर टू थ्राईव" उपक्रम सुरू करून आमचा हाच विश्वास दृढ करताना आम्हाला अतीशय अभिमान वाटतो. आम्हाला या प्रवासाबद्दल अतीशय उत्सुकता असून यामुळे मुलींचा डिजिटल समावेशनाला चालना देता येईल आणि वंचित कुटुंबियांना यामुळे नक्कीच मदत मिळेल. कित्येक वर्षांकरिता, आमचे कर्मचारी कित्येक तासांकरिता स्वेच्छेने आपल्या निपुण अशा कौशल्याचा वापर करून या समाजाचे सबळीकरण करण्याचा प्रयत्न करतात.कौशल्यांना प्राधान्य देणारी संस्था म्हणून, ही आमची वचनबद्धता आहे की आमचा स्वत:चा कर्मचाऱ्यांकरिता देखील शिक्षण आणि विकास कार्यक्रमांचा विस्तार करावा आणि त्यांना त्यांचे कौशल्य सुधारता यावे किंवा पुनरुज्जीवित करता या म्हणून आम्ही भरपूर गुंतवणूक देखील करतो."

**"आमचे ध्येय हे तरूणांना सबळ बनविण्याचे आहे, विशेषत: लहान गावांमधून येणाऱ्या मुली ज्यांना आवश्यक ते कौशल्य, प्रशिक्षण आणि संधी उपलब्ध व्हाव्या आणि त्यांचात आत्मविश्वास निर्माण होऊन त्या रोजगाराकरिता तयार राहाव्या असे आम्हाला वाटते.आम्हाला AXA सह त्यांचा"डेअर टू थ्राईव" उपक्रमात एकत्र येताना अतीशय आनंद होतो आहे आणि या विद्यार्थ्यांचा आयुष्यात चांगल्या आर्थाने बदल घडविता येतील असा आम्हाला विश्वास आहे." असे फ़्युएलचे सीईओ, केतन देशपांडे म्हणाले.**







दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.